INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 5.828 (SJIF 2022)

# मराठी संत साहित्यातील निसर्ग

## (Nature in Marathi Saint Literature)

**डॉ. रवींद्र बाबासाहेब ढास**

सहायक प्राध्यापक
मराठी विभाग प्रमुख,
महिला कला महाविद्यालय, बीड
E-mail: ravindradhas4@gmail.com

**DOI No.** 03.2021-11278686 **DOI Link ::** https://doi-ds.org/doilink/04.2022-37454293/IRJHIS2204021

**प्रस्तावना :**

इसवी सनाच्या तेराव्या शतकापासून महाराष्ट्राला ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम, रामदास अशा अनेक थोर संतांची परंपरा लाभली आहे. म्हणूनच महाराष्ट्राला संतांची भूमी असे म्हटले जाते. या संतांचा महाराष्ट्रात उगम झाला नसता तर महाराष्ट्र संस्कृतीचा सर्वनाश अटळ होता,असे म्हटले तर वावगे वाटू नये. या संतांनी आपल्या वाणीने, लेखणीने आणि कृतीने आपल्या प्राचीन वैदिक धर्माचे आणि गीताधर्माचे पुनरुज्जीवन केले. समाजाला भावनिक, नैतिक आणि आत्मिक आधार देऊन समाजाचे रक्षण केले. आत्मोन्नत्तीचा भक्तिमार्ग दाखविला.

या सर्व संतांनी, त्या काळात संपूर्ण भारतभर संन्यासवादाचा प्रभाव असूनही, संन्यासाला, संसार त्यागाला निक्षून विरोध केला. संसारात राहूनही नित्य नामस्मरण करत राहिले तर मोक्षप्राप्ती होते, परमेश्वर प्राप्ती होते असा उपदेश केला. 'सत्यवादी करी संसार सकळ, अलिप्त कमळ जळी जैसे | घडे ज्या उपकार, भूतांची ते दया, आत्मस्थिती तया अंगी वसे'|| असे तुकाराम महाराजांनी एका अभंगातून प्रतिपादन केले आहे. 'आधी प्रपंच करावा नेटका' हा या संतांचा मुख्य उपदेश होता.

प्रापंचिकांना उपदेश करताना हे सर्व संत तत्कालिन समाजजीवनातील, आजूबाजूच्या परिसरातील पशु, पक्षी, कीटक, वनस्पती इत्यादींच्या वैशिष्ट्यांचा सहज सुंदर दाखला देत. नामदेव, रामदास यांनी तर तीर्थयात्रेच्या निमित्ताने संपूर्ण भारतभर पदभ्रमण केले होते. निसर्गाची विविध रूपे त्यांनी पाहिली व अनुभवली होती. आपल्या काव्यातून त्यांनी ती समाजापुढे मांडली. ज्ञानेश्वरी, गाथा, दासबोध यांसारखे संत वाङमय वाचताना आपल्याला ठायी ठायी ह्या गोष्टीचा प्रत्यय येतो.

'मराठी संत साहित्यातील निसर्ग' या विषयाच्या निमित्ताने ज्यांत निसर्गातील अशी नवलाई अनुभवास आली, प्रापंचिकांना उपदेश करताना पशुपक्ष्यांच्या, वनस्पतींच्या वैशिष्ट्यांचे जे दाखले दिले गेले, निसर्गाचे महत्त्व विशद केले गेले अशा अभंगांचा, ओव्यांचा, काव्याचा आपण थोडक्यात परिचय करून घेऊ.

प्रापंचिक माणसाला नेहमी उद्याची चिंता असते. परंतु पशुपक्षी कधीही खाद्याचा, चारापाण्याचा संचय करत नाहीत. माणूस मात्र उद्याची विवंचना करत वर्तमान दुःखात व्यतित करतो.यावर तुकाराम महाराज म्हणतात, 'हे चि चिंता काय खावे म्हणउनि | भले तुजहुनी पक्षिराज '||

पावसाळ्यात सर्वत्र डराव डराव करणारे बेडूक पावसाळा संपताच जमिनीत खोलवर जाऊन उर्वरित आठ महिने काहीही न खातापिता तेथेच विश्रांती घेतात. ह्याला शीतनिद्रा असे म्हणतात आणि याचे ज्ञान अलिकडे झाले

आहे. तुकाराम महाराज याचा दाखला देताना सांगतात,

पाषाणाचे पोटी बैसला दर्दुर | तया मुखी चारा कोण घाली ||
पक्षी अजगर न करी संचित | तयासी अनंत प्रतिपाळी ||

उंबराच्या फळात असंख्य किडे असतात आणि उंबर हेच जणू त्यांचे जग असते. बाहेरील विश्वाच्या पसाऱ्याची त्यांना कल्पनाही नसते. मानवी समाजातही अशा काही व्यक्ती असतात जे त्यांच्या आसपासच्या अवकाशालाच विश्व समजतात. त्यांना तुकाराम महाराज उपदेश करतात,

उंबरातील कीटका | हेचि ब्रह्मांड ऐंसे लेखा || ऐसी उंबरे किती झाडीं | ऐशीं झाडें किती नवखंडी ||

या ठिकाणी गदिमांच्या 'जग हे बंदिशाला' या गीतातील 'उंबरातले कीडे मकोडे, उंबरी करती लीला' या ओळीची सहजच आठवण येते आणि संत काव्य समाजात किती खोलवर रूजलंय हे जाणवते.

तुकाराम महाराजांचा 'वृक्षवल्ली आम्हां सोयरी वनचरी | पक्षीही सुस्वरें आळविती '|| हा अभंग सर्व परिचित आहे. ज्ञानेश्वरांनीही ज्ञानेश्वरीच्या सहाव्या अध्यायात योगाभ्यासास योग्य स्थान कसे असावे याचे वर्णन केले आहे. ज्ञानेश्वर महाराज म्हणतात,

जेथ अमृताचेनि पाडें | मुळेंही सकट गोडें | जोडती दाटें झाडें | सदा फळतीं ||
पाउला पाउला उदकें |वर्षाकाळीही परिचोखें | निर्झरें का विशेखें | सुलभे जेथ ||
पाणिलगें हंसे | दोनी चारी सारसें |कवणे एके वेळे बैसे | तरी कोकिळही हो ||
निरंतर नाहीं | तरी आलीं गेलीं काहीं | होतु कां मयुरेंही | आम्ही ना न म्हणों ||

निसर्गाच्या सान्निध्यात, जनांपासून दूर विजनांत माणसाचे मन शांत होते. माणूस स्वतःशी संवाद साधू शकतो. आजच्या धावपळीच्या आणि कोलाहलाच्या वातावरणात आपण स्वतःशी संवाद साधू शकत नाही. त्यामुळे मानसिक ताण तणाव वाढून मनोविकारांना बळी पडतो. आज समाजात मनोरुग्णांच्या संख्येत वाढ झाल्याचे चित्र पाहायला मिळते. तुकाराम महाराजांच्या काळात आजच्यासारखी परिस्थिती नव्हती तरीही निरोगी मनासाठी वनांची, पशुपक्ष्यांच्या सहवासाची आवश्यकता कशी असते ते त्यांनी या अभंगातून स्पष्ट केले आहे.
कुटुंबवत्सल माणसाने प्रपंच करावा पण त्यात गुंतून पडू नये हा उपदेश करताना एकनाथांनी पक्ष्यांचा दृष्टांत कसा दिला आहे ते पाहा,

पक्षी अंगणी उतरती | ते का गुंतोन राहती | तैसे असावे संसारी | जोवरी प्राचीनाची दोरी ||

कोणत्याही घटनेला परमात्मप्राप्तीकडे वळविण्यात नाथांचा हातखंडा होता. कपोत-कपोती कथा ह्या स्फुट काव्यात कपोत-कपोतीच्या माध्यमातून त्यांनी मानवी प्रेमी युगुलाचे अत्यंत वास्तवदर्शी चित्र रेखाटले आहे. ते संपूर्ण काव्य मुळातून वाचायला हवे.

ज्ञानेश्वरांनीही एका ओवीत कपोत म्हणजेच पारव्याचे सुरेख चित्रण केले आहे. ती ओवी अशी,

पै पारिवा जैसा किरीटी | चढला नभाचिये पाठी | पारवी देखोनिया लोटी | आंगचि सगळे || ज्यांनी रानात होल्याला उडताना पाहिले असेल त्यांना या उपमेची यथार्थता लगेच लक्षात येईल.

खरं म्हणजे ज्ञानेश्वरांच्या निसर्गवाचनाला दाद द्यावी अशा अनेक ओव्या ज्ञानेश्वरीत आढळतात. उदा. कासवाची मादी किनाऱ्यावर मातीत अंडी घालते. उन्हाने रेती गरम होऊन अंडी उबतात आणि पिले बाहेर येतात. ही पिले स्वतंत्रपणे जगतात आणि वाढतात.कासवी प्रत्यक्ष पिलांचे पोषण करत नाही. आत्मसंगती जडाला चेतनादशा कशी आणते ते सांगताना ज्ञानेश्वरांनी तेराव्या अध्यायातील,

आगा मुखमेळेविण | पिलियाचे पोषण | करी निरीक्षण | कूर्मी जेवी || या ओवीत कासवीणीचा दृष्टांत देताना या वस्तुस्थितीचा आधार घेतला आहे.

बांबूला साठ वर्षांनंतर एकदाच फुलोरा येतो. त्यानंतर बांबू निष्फळ होतो.निष्काम कर्मयोगाची महती सांगताना फळाची आशा न धरता जी कार्ये केली जातात ती पुढे वाढत नाहीत हे स्पष्ट करताना ज्ञानदेव बांबूच्या फुलोऱ्याचा दृष्टांत देतात. ती ओवी अशी,

येणें फलत्यागे सांडे | तें तें कर्म न विरूढे | एकचि वेळें वेळुझाडें | वांझें जैसीं ||

हिमालय चढला असता पापाचा नाश होतो पण तेथे प्राणवायूची कमतरता असल्यामुळे हिमालयाच्या शिखरावर चढताना मरण ओढवण्याची शक्यताही असते.

हे हिमवंतु दोषे खाये | परि जीविताची हानि होये | तैसे शुचित्व नोहे | सज्जनांचे || या ओवीत त्यांनी सांगितले आहे.

वारूळ हा निसर्गातील एक चमत्कार समजला जातो. त्यावर गेल्या काही दशकात संशोधनही झाले आहे. ज्येष्ठ पक्षितज्ज्ञ व निसर्ग अभ्यासक मारुती चितमपल्लींनी 'टेकराज' या लेखात वारूळाची नाविन्यपूर्ण माहिती दिली आहे. गांधारीच्या माधो गोंडानं त्यांना एक डुंबर म्हणजेच वारूळ कोयत्यानं हळुवार खोदून उकरून दाखवलं तेव्हा आतील अभूतपूर्व सौंदर्यानं त्यांना माहिनी घातली. हजारो नाना रंगांच्या, इवल्या इवल्या अळंबींनी ते वारूळ भरून गेलं होतं. ज्ञानेश्वरांनी अकराव्या अध्यायात,ज्ञानेश्वरांनी अकराव्या अध्यायात,

कां आकाशी गंधर्वनगर| भूतळीं पिपीलिका बांधे घर | नाना मेरुवरीं सपूर | परमाणु बैसले || या ओवीत वारूळाची आकाशातील गंधर्व नगराशी तुलना केली आहे आणि मेरू पर्वतावर लहान लहान परमाणू बसावेत तसे वारूळातीच्या आतील मुंग्याचे घर दिसते असे सांगितले आहे.विशेष म्हणजे हे वर्णन अर्जुनाला विश्वरूप घडते त्याचे आहे. ज्ञानेश्वरांच्या अलौकिक उपमा पाहून आपण थक्क होतो आणि वारूळाची एवढी सूक्ष्म माहिती त्यांनी केव्हा व कशी घेतली असेल याचे राहून राहून आश्चर्य वाटते.

पावसाच्या सुरुवातीला सरड्यांचा वीणीचा काळ सुरू होतो. त्यावेळी नर सरडे मादीला आकर्षित करण्यासाठी खडकांच्या टोकावर, झाडांच्या शेंड्यांवर चढून गळा फुगवून प्रदर्शन करतात. इकडून तिकडे, तिकडून इकडे अशी सारखी त्यांची धावाधाव चाललेली असते. ही अवस्था ज्ञानेश्वरांनी

का मातलिया सरडा | पुढती बुड पुढती शेंडा | हिंडणवारा कोरडा | तैसा जया || या ओवीत चपखलपणे वर्णिली आहे. त्याचवेळी मदनाचा वात किंवा वारा शिरल्यामुळे म्हणजेच मदनबाधा झाल्यामुळे एखादी व्यक्ती जे चाळे करते त्या वाताला 'हिंडणवारा' असा सर्वस्वी नवीन शब्द मराठी भाषेला दिला आहे.

ज्ञानेश्वरीत अशी अनेक निसर्गाची वैशिष्ट्ये,गुपिते, चमत्कार पाहायला मिळतात. त्यातील काही गुपिते अजून पुरती उलगडली नाहीत. जसे केळीच्या सोपटात कापूर तयार होतो असा, "नातरी केळीं कापूर जाहला | जेवीं परिमळें जाणों आला || आणि कर्पूरकेळीचीं गर्भपुटें | उकलतां कापुराचेनि कोंदाटें |

ह्या दोन ओव्यात उल्लेख आला आहे. ज्या केळीच्या गाभ्यात कापूर तयार होतो तिला कापूरकेळी म्हणतात. या गोष्टीचा काही उलगडा झालेला नाही. कधीतरी ही ओवी डोळे उघडून पाहील आणि अर्थ उलगडेल अशी आशा वाटते.

खरं म्हणजे संतांच्या निसर्गवाचनाची प्रचिती ज्यात दिसून येते अशी कैक उदाहरणे आपल्याला संत साहित्य वाचताना पदोपदी आढळतात. आणि त्यावरून संतांच्या निसर्ग ज्ञानाचा आवाका केवढा मोठा होता तेही जाणवते. अर्थात काही काही वेळा त्यांच्या निरिक्षणात काही त्रुटीही जाणवतात परंतु त्याकाळी आजच्या सारखी दुर्बीण, कॅमेरे वगैरे साधने उपलब्ध नव्हती ही गोष्ट ध्यानात घ्यायला हवी.

मुख्य म्हणजे निसर्गवाचन हा काही ह्या संतांचा अभ्यासाचा विषय नव्हता आणि जीवनाचे ध्येय तर अजीबात नव्हते. ज्ञानेश्वरांसारख्या अलौकिक प्रज्ञावंताला निसर्गाचे सम्यक ज्ञान प्राप्त करणे अशक्य
नव्हते. परंतु तो त्यांचा ध्येय विषयच नव्हता. किंबहुना ह्या मार्गातील धोके, खाचखळगे यांची त्यांना पुरेपूर कल्पना असावी. त्यामुळेच त्यांनी ह्या गोष्टीचा जरूरीपुरताच वापर आणि प्रसार केला.

आज समाजात निसर्ग प्रेम वाढलेले दिसते पण त्याचबरोबर त्याला अनिष्ट वळण लागलेले दिसते. निसर्गातील सौंदर्यस्थळांची माहिती करून त्याचा व्यावसायिकदृष्ट्या कसा उपयोग करता येईल याकडेच तथाकथित पर्यावरण व निसर्गप्रेमींचे लक्ष लागलेले दिसते. दुर्मीळ पशुपक्ष्यांचे चित्रीकरण करताना कोणताही विधिनिषेध बाळगला जात नाही. पक्ष्यांच्या घरट्यांचे फोटो काढताना घरटी उद्धस्त केली जातात. फुलांनी फुललेले

पठार अनधिकृत बांधकामे करून भकास केले जाते. संतांनी ह्या संभाव्य धोक्याचा निश्चितच विचार केला होता आणि त्यामुळे सामान्य माणसाला मोक्षप्राप्तीच्य मार्गावर नेण्यासाठी केवळ उदाहरण म्हणून, उपमेसाठी फक्त ह्या निसर्गाच्या वैशिष्ट्यांचा उपयोग केला असे म्हणावेसे वाटते.

सर्वच संतांचा परमानंद म्हणजे भगवंताचे दर्शन घडणे. निसर्गातील साध्या साध्या गोष्टीतही त्यांना पांडुरंगच दिसे. त्यामुळे कावळा कोकलायला लागतो तेव्हा ज्ञानेश्वरांना तो त्यांना शकुनच वाटतो. आपल्याकडे पाहुणा येणार याचा त्यांना आनंद होतो. कारण हा पाहुणा कुणी साधासुधा नसतो तर साक्षात पंढरीचा राणा असतो. त्यामुळे ते कावळ्याला तुझे पाय सोन्याने मढवीन, तुला दही-भात खाऊ घालीन, वाटी भरून दूध प्यायला देईऩ एवढेच नव्हे तर रसाळ आंबे चुंबायला देईन एवढी आश्वासने देतात. हे सर्व कशासाठी तर त्याने खरे सांगावे म्हणून. खरोखर कावळ्यासारख्या एका तिरस्कृत आणि कायम झिडकारले जाणाऱ्या पक्ष्याला आमंत्रण देऊन त्याची एवढी बडदास्त ठेवणारा, रसाळ आंबे चुंबायला देणारा हा महाकवी. म्हणूनच त्याने सर्व प्राणीमात्रांमधे मैत्र निर्माण व्हावे या साठी भगवंताकडे पसायदान मागितले. 'जें भेटें भूत| तें तें मानिजे भगवंत' || हे उक्तीने आणि कृतीने दाखवून देणारा असा हा असामान्य प्रतिभेचा कवी.

शेवटी या संतांच्या काव्यातील आणि साहित्यातील निसर्ग शोधताना एक गोष्ट ठळकपणे जाणवली ती म्हणजे 'जगा आणि जगू द्या ' हा मूलभूत संदेश. आजच्या परिस्थितीत त्याचीच नितांत गरज आहे एवढेच म्हणावेसे वाटते.

**संदर्भ:-**

1) ज्ञानेश्वरी- संत ज्ञानेश्वर
2) तुकाराम गाथा- संत तुकाराम
3) संत एकनाथांचे अभंग